**ई निविदा अतंर्गत खुली निविदा सुचना**
**निविदा सूचना क्र.०१/२०२६**
**पुणे जिल्हा परिषद , पुणे**
**आरोग्य विभाग**

शासन निर्णय दि.१५ जुलै, २०१४ अन्वये जिल्हा परिषदांमधील ई निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा फी व इसारा रक्कम ही RTGS/NEFT व्दारे स्वीकारणेबाबत धोरणात्मक निर्णय निर्गमित केलेप्रमाणे पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेतर्फे बाहय यंत्रणाद्वारे (**Outsoursing**) मनुष्यबळ/ कामगार पुरविणेची नोंदणी असलेल्या कंत्राटदारांकडून दोन लिफाफा पध्दतीने आरोग्य विभागांअंतर्गत जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता मनुष्यबळ पुरविण्याकरिता ई निविदा मागविणेत येत आहेत.

| **अ. क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजित रक्कम रु. (लाखात)** | **बयाणा रक्कम रूपये (EMD)** | **कोऱ्या निविदाची रक्कम रू.** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | बाहय यंत्रणेद्वारे प्रा.आ.केंद्र शेळगांव व काटी (इंदापुर), लांडेवाडी, अवसरी खु., शिंगवे व तिरपाड (आंबेगाव) माळेगांव (बारामती) शिरोली बु. (जुन्नर), हिर्डोशी व भुतोंडे (भोर), वेताळे (खेड), पानशेत (वेल्हे), रांजणी (आंबेगाव), केवाडी (जुन्नर) साठी प्रती १० प्रमाणे कंत्राटी मनुष्यबळ पुरविणे एकुण संख्या -१४० **(परिशिष्ट ब मधील शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता नुसार)** | र.रु.२,७४,०३,८३८/- | १ टक्के | २५०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंचवीस हजार फक्त) |

१. सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ई- निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदेसंदर्भातील निविदा नोटीस प्रसिद्धी, सुचना, शुद्धीपत्रके इत्यादीची माहीती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. वरील कामांचे निविदा प्रपत्रे http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती इ. सदर संकेत स्थळावरुन दिनांक. 8 /5/२०२६ रोजी 11.०० वाजलेपासून दिनांक 22/5/२०२६ रोजी 17.०० वाजे पर्यंत ऑनलाईन पद्धतीने सादर करता येतील.

३. निविदा सोबत खालील बाबी सादर करणे आवश्यक आहे .

**(अ)** सदर कामाची निविदा डाऊनलोड (Download) करणेसाठी निविदा सुचनेच्या तक्त्यातील रकाना क्र. ५ मध्ये नमुद रक्कम **ऑनलाईन बँकीगव्दारे** भरण्यात यावी.

(ब) बयाणा रकमेपोटी निविदा सूचनेच्या तक्त्यातील रकाना क्र. ४ मध्ये नमुद रक्कम ऑनलाईन बँकीगव्दारे भरण्यात यावी.

४. निविदाधारकानी निविदा खालीलप्रमाणे दोन लिफाफा पध्दतीने (Two Envelope) ई - निविदा सादर करणे आवश्यक आहे.

**(अ) तांत्रीक लिफाफा (लिफाफा क्र.१ )**

१. खालील Annexure - A प्रमाणे प्रमाणपत्र स्कॅन करुन त्याची प्रत अपलोड Upload करणे आवश्यक आहे.

## Annexure - A

### बाहय यंत्रणेकडील कुशल व अकुशल पुरवठा करणा-या एजन्सी करीता पात्रता तपासणी सुची

| अ.क्र | कागदपत्र सुची | होय/नाही |
|---|---|---|
| १ | संबंधित संस्था कायद्यांतर्गत नोंदणीकृत असावी व त्याची प्रत सादर करावी. | |
| २ | GST नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे. | |
| ३ | पॅनकार्ड प्रत सादर करावी. | |
| ४ | EPF नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे. | |
| ५ | EPF भरलेचे माहे. नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ चलने सादर करणे आवश्यक आहे. (प्रती महिना ९५ कामगार आवश्यक आहे.) | |
| ६ | ESIC नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे. | |
| ७ | ESI भरलेचे माहे नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ चलने सादर करणे आवश्यक आहे. (प्रती महिना ९५ कामगार आवश्यक आहे.) | |
| ८ | निविदाधारकांची संस्था शासनाच्या कोणत्याही विभागा मार्फत काळया यादीत समाविष्ठ नसलेचे संस्था प्रमुखाने ५००/-रुपये स्टॅम्प पेपरवर स्वाक्षरी व स्टॅम्पसह सादर करावे. | |
| ९ | अटी व शर्ती मान्य असलेबाबत अटी व शर्तीवर निविदाधारकांनी स्वाक्षरी व स्टॅम्पसह सादर करावे. | |
| १० | निविदाधारकाने स्थानिक स्वराज्य संस्था मधील प्राथमिक आरोगय केंद्रा मध्ये कुशल/अकुशल पुरवठा केलेला एकाच पुरवठा आदेशामध्ये ९५ पेक्षा जास्त कामगार पुरवलेचा सन २०२२ नंतरचे अनुभव प्रमाणपत्र व पुरवठा आदेश सादर करणे बंधनकारक राहिल. | |
| ११ | निविदाधारकाचे एकत्रित आर्थिक उलाढाल रक्कम रु. २.५ कोटी असलेबाबतचे नोंदणीकृत सनदी लेखापालाने प्रमाणित केलेचे प्रमाणपत्र UDIN क्रमांकसह पाच वर्षाचे सादर करावे. (सन २०२०-२०२१ ते २०२४-२०२५) (कृपया ITR जोडू नयेत) | |
| १२ | लेबर कायदा १९७० नुसार कंत्राटी कामगार परवाना प्रत सादर करावा. | |
| १३ | महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ नुसार कोड नंबरचा दाखला सादर करावा. | |
| १४ | निविदा भरताना सादर केलेली कागदपत्रांचे सत्यतेबाबत संस्थेच्या लेटरपॅडवर प्रमाणपत्र सादर करावे. | |

**(ब ) आर्थिक लिफाफा (लिफाफा क्र.२)**

निवेदेत नमूद केलेली रक्कम रु. २,७४,०३,८३८/- ही असून कामगारच्या ११ महिन्याच्या वेतनाची रक्कम वगळून नमूद केलेली आहे. देयकाची आदाई करताना १८ टक्के अथवा अनुज्ञेय GST अदा करणेत येईल. निविदाकार यांनी र.रु. २,७४,०३,८३८/- या निविदा रकमेवर सदर अपेक्षीत असलेले सेवा शुल्क/ नफा हा टक्केवारी मधील दर विहित BOQ लिफाफा क्रं.२ मध्ये भरून अपलोड करावे. **शुन्य किंवा वजा सेवा शुल्क दर भरल्यास निविदा रद्द करणेत येईल.** तसेच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रित्या निविदेचे दर इतर कोठेही नमूद करणेत येऊ नयेत.

**(क) निविदा सादर करणे.**

**उपरोक्त** प्रमाणे नमुद दोन लिफाफा पध्दतीने निविदा ऑनलाईन पद्धतीने अपलोड करून सादर करावी लागेल .निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ बंधनकारक राहील. मक्तेदारांनी विहीत वेळेपुर्वी त्यांची निविदा अपलोड करणेची दक्षता घ्यावी.

१. ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला लिफाफा क्र. १ (तांत्रिक लिफाफा) शक्यतो दि. १३/५ /२०२६ रोजी १७.०० वाजता उघडणेत येईल.
२. तांत्रिक बाबीत पात्र ठरलेल्या निविदाकारांची आर्थिक बाबी विषयक निविदा उघडणेत येईल.
३. निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना, शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

४. निविदेतील अटी वा शर्ती पुर्ण न करणा-या मक्तेदाराच्या निविदा अपात्र समजल्या जातील .

५. कोणत्याही अटीवर ( Conditional ) आधारित निविंदा स्विकारल्या जाणार नाहीत.

६. ई-निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणत्याही टप्प्यात कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेचा हक्क निम्न स्वाक्षरीधारक यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

७. संक्षिप्त निविदा सुचना व सविस्तर सुचना निविदा कराराचा एक भाग राहील

८. सदरची कागदपत्रे ही निविदा प्रसिध्दी पूर्वीची असणे आवश्यक आहे.

९. कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास त्याबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचा निर्णय अंतिम राहील.

१०. सदरची निविदा ११ महिने कालावधीसाठी असली तरी मंजुर झालेल्या दराने पुढील निविदा निश्चित होईपर्यंत काम करावे लागेल.

गजानन पाटील (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद पुणे

# आरोग्य विभाग अंतर्गत कामगार पुरविणेबाबतच्या अटी व शर्ती

१. कामगारांनी ग्रामिण भाग,डोंगराळ भाग,व अतिदुर्गम भागात काम दिलेल्या ठिकाणी काम करावे लागेल.
२. कामावर असताना नियमाप्रमाणे संबधीत संस्थेचे ओळखपत्र लावणे बंधनकारक राहील.
३. निवड करणेत आलेल्या कंत्राटी मनुष्यबळ जिल्हा आरोग्य अधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी,यांच्या परवानगीशिवाय बदलणेत येऊ नये.
४. कामगारांचा इन्श्युरन्स काढणे आवश्यक राहील.
५. कामगाराच्या निष्काळजीपणामुळे प्रा.आ.केंद्रातील वस्तुचे काही नुकसान झाल्यास संस्थेस त्याच्या दुरुस्तीचा खर्च करावा लागेल.तसेच दुर्देवाने कामगारांना गंभीर स्वरुपात इजा झाल्यास त्यांच्या वैद्यकीय खर्चाचे अथवा नुकसानभरपाईचे उत्तर दायित्व हे पूर्णत: संबंधित संस्थेची राहील.
६. सदर कंत्राटाचा कालावधी कमीत कमी ११ महिनेचा राहील. सदर कंत्राट मान्य केलेल्या दराने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.पुणे यांचे मान्यतेने पुढील ११ महिन्याचा कालावधी अथवा पुढील ठेकेदार निश्चिती होईपर्यंत मुदतवाढ देण्यात येईल.
७. कंत्राटदाराच्या सेवा सूचनानुसार होत नसतील तर त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे व त्यातूनही सुधारणा न झाल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
८. कंत्राटदारांच्या सेवा सुचनांच्या अनुषंगाने न आढळल्यास त्या कुठल्याही क्षणी रदद करण्याची शिफारस प्राथमिक आरोग्य केंद्र प्रमुख,जिल्हा आरोग्य अधिकारी,मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे करतील अशा परिस्थितीत कंत्राटदाराने भरलेले हमी रक्कम जप्त करणेत येईल.
९. कामगार सेवेची वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र देतील उपस्थिती हजेरीपत्रक देतील.
१०. असमाधानकारक सेवेबाबत समज देण्यात येईल व कामात सुधारणा न दिसून आल्यास प्रशासकीय कारवाई करणेत येईल.
११. कोणत्याही कारणाने सदर सेवा अचानकपणे खंडीत केल्यास संबधित ठेकेदार व नियुक्ती कामगार नागरीकांच्या जिवितास धोका पोहचवल्याबददल दंडात्मक व फौजदारी कारवाईस पात्र ठरतील.
१२. निविदाधारकांनी सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहून कामगार सेवेबाबतचे दर नमूद करावेत
१३. कंत्राटदाराला देयकाची रक्कम शासनाकडुन अनुदान उपलब्ध झालेनंतर अदा करणेत येईल.जरी काही अपरिहार्य परिस्थितीत जिल्हा परिषदेकडून अनुदान उपलब्ध होण्यास विलंब झाला तरी ठेकेदाराने कंत्राटी कुशल व अकुशल मनुष्यबळ कामगारांचे दरमहाचे मानधन दरमहा १० तारखेपूर्वी त्यांचे बॅक खात्यामध्ये वर्ग करणे बंधनकारक राहील. कामगारांचे मानधन वेळेवर न झाल्याने त्यांचे कामावर परिणाम होणार नाही याची कंत्राटदाराने दक्षता घ्यावी.
१४. कामगार ५ दिवसा पेक्षा जास्त कालावधी आजारपण अथवा सुटटी आवश्यक असेल तर कंत्राटदार यांनी पर्यायी कामगाराची व्यवस्था करणे.
१५. ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर होईल त्याने ३ टक्के अनामत रक्कम भरुन करारनामा ७ दिवसाचे आत करुन न दिल्यास त्याची बयाना रक्कम जप्त करुन निविदा रदद करण्यात येईल.
१६. निविदेमधील सर्व दर करांसह GST वगळून असावेत वेगळा कर आकार दिला जाणार नाही.
१७. सशर्त निविदा मान्य केली जाणार नाही.
१८. कामगारांची संपूर्ण सेवा करारपध्दती व तात्पुरत्या स्वरुपात आहे.त्यांना कोणतेही शासकीय फायदे अनुज्ञेय होणार नाही.
१९. करारसंदर्भात काही गुंतागुंत निर्माण झाल्यास कंत्राटदारास जिल्हा आरोग्य अधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे निवेदन सादर करण्याचा हक्क राहील.या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.पुणे यांचा निर्णय अंतिम राहील.
२०. कंत्राटी पध्दतीतील कामगार संख्या कमी/जास्त करणेचा अधिकार मा.मु.का.अ.जि.प.पुणे यांनी राखून ठेवणे आलेला आहे.
२१. अपरिहार्य परिस्थितीत मा.मु.का.अ.जि.प.पुणे यांनी निर्देशित केल्यावर निवेदेत नमूद कंत्राटी कामगार जादा कामगारांचा पूरवठा करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

२२.शासन स्तरावरुन निविदा/पुरवठा आदेश स्थगित अथवा रद्द करणेबाबत आदेश/सुचना प्राप्त झाल्यास सदरची निविदा रद्द करणेचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.पुणे यांना राखून ठेवणेत येत आहेत.

२३.शासन स्तरावरुन वाहनचालक उपलब्ध करुन देणेत आल्यास सदर निविदा/पुरवठा आदेश पुरवठा कालावधी पूर्ण होण्याच्या अगोदर रद्द करण्याचे अधिकार मा. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.पुणे यांना राखून ठेवण्यात येत आहेत.

२४. कामगाराला कोणताही शासकीय लाभ (रजा प्रवास भत्ते, अतिकालीक भत्ता इ.) अनुज्ञेय होणार नाही.

२५.या कार्यालयाने कंत्राटदारास कामगार सेवा पुरविणेचा आदेश वितरीत केल्यापासून ७ दिवसाचे आत सर्व कामगार नमूद करणेत आलेल्या ठिकाणी प्रा.आ.केंद्रांना हजर होणे आवश्यक आहे.

२६.निविदा जिल्हा परिषदेने पुरविलेल्या अनुमुद्राकित निविदावर दयाव्यात.प्रा.आ.केंद्र कामगार सेवा उल्लेख केला आहे.त्याच बाबींचे दर दयावेत.निविदेमध्ये नमूद केल्या व्यतिरिक्त ज्या बाबींचे दर दिले जातील त्यांचा विचार केला जाणार नाही.

२७. कंत्राटी कामगारांचे दरमहाचे हजेरीपत्रक संबधित प्रा.आ.केंद्राकडून प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. प्राप्त झालेल्या हजेरी पत्रकानुसार ठेकेदारास देयक रक्कम अदा करणेत येईल.

२८.सदर निविदा भरताना शासन निर्णयानुसार व किमान वेतन अधिनियम १९४८ अन्वये महाराष्ट शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसुचनेनुसार मुळ वेतन भत्ता पीएफ/ईएसआय नियमानुसार देणे बंधनकारक राहील वेळोवेळी संबधित सफाई कामगारांच्या खाती व शासन सदरी भरल्याबाबत लिखित पुरवा उपलब्ध करुन दिल्यानंतरच पुढील महिन्याच्या देयकाची ठेकेदारास अदायी करण्यात येईल.व बाहय यंत्रणेकडील कामगार किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन अदा करणे कंत्राटदारास बधंनकारक असेल. तसेच निविदा मंजूर झाल्या नंतर भविष्यात वाढ होणारे मुळ वेतन व विशेष भत्ता कर्मच-यांना देणे बधंनकारक राहील.

२९. शासनाचे अनुदान प्राप्त होत नाही. तोपर्यंत संबंधित कामगारांचे नियमित मानधन प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत अदा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.

३०. सदर निविदेबाबत कोणताही न्यायालयीन वाद झाल्यास त्याची कक्षा पुणे जिल्हा न्यायालय राहील.

३१. सदर निविदेतील तांत्रिक पदाची कागदपत्रे पडताळणी तांत्रिक समिती आरोग्य विभाग यांचेकडून करुन घेणे बंधनकारक राहील.

३२.सदर ठिकाणी कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्राधान्य दयावे.

३३.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१८/प्र.क्र.३२८ / आरोग्य-३ दि.१७ मार्च २०२० अन्वये किमान वेतन व सदर कामकाज स्थानिक स्वराज्य संस्थातंर्गत असल्याने मा. आयुक्त, कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयाकडून जाहिर होणारा विशेष भत्ता कामगारांना देणे बंधनकारक राहील.

३४. कंत्राटदारा मार्फत कंत्राटी कामगार किमान वेतन कायादयान्वये देय असलेले वेतन अदा करणे बंधनकारक असल्याने तसेच शासनास विहित GST ची रक्कम भरावयाची असल्याने सेवा शुल्कचे (निव्वळ नफयाचे) दर विचार पुर्वक भरणे अपेक्षीत आहे.

३५.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा ( सेवा प्रवेश) नियम १९६७ नुसार सोबतच्या परिशिष्ट-ब नुसार शैक्षणिक अर्हता धारण करणारे मनुष्यबळ पुरविणे बंधनकारक आहे.व त्या पदासाठी शासनाने निश्चित केलेल्या कर्तव्य सुची नुसार व नियंत्रण अधिकारी यानी दिलेल्या सुचना नुसार काम करणे बंधनकारक राहील

वरील प्रमाणे अटी व शर्ती क्र. १ ते ३५ चे पालन काटेकोरपणे करणेत यावे. करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन केलेले आढळून आलेस आपला करारनामा रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

गजानन पाटील (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद, पुणे

Signature Not Verified
Digitally signed by RAMCHANDRA SHIVRAM HANKARE
Date: 2026.05.07 17:02:22 IST
Location: Maharashtra-MH